# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट दिनांक -१६/०१/२०२३

**महाळुगे पोलीस चौकी कारवाई**

**एम.आय.डी.सी.परिसरात** गांजा नावाचा अंमली पदार्थाची तस्करी करणा-या **गुन्हेगाराला महाळुंगे पोलीसांनी ठोकल्या बेडया**

------------------------------------------------------------------------------ooooo------------------------------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार श्री विनयकुमार चौबे यांनी स्विकारल्यानंतर त्यांनी एमआयडीसी हद्दीमध्ये बेकायदेशीर/अवैद्य दारु,जुगार,मटका,गांजा व अन्य अशा धंद्यांवर प्रभावी कारवाई करून सदर धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत आदेश दिले होते.त्यानुसार महाळुंगे पोलीस चौकीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री ज्ञानेश्वर साबळे यांनी महाळुंगे पोलीस चौकीचे तपास पथकातील अंमलदार यांना गोपनीय माहीती काढून कारवाई करण्याबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार दिनांक १५/०१/२०२३ रोजी पोलीस नाईक चाफळे यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहीती मिळाली कि,एक इसम खालुंब्रे परीसरात गांजा विक्री करण्याकरीता येणार आहे.त्यानुसार वपोनि श्री ज्ञानेश्वर साबळे व पोनि(गुन्हे) श्री किशोर पाटील यांनी पोउपनि गायकवाड, पोना/१६९१ चाफळे, पोहवा/४६७ नवले, पोना/पाटील,पोना/१२७३ वाजे,पोअं/२२७५ खैरे, पोअं/२८०० खेडकर,पोअं/२४३५ माटे,पोअं/२२९५ खराडे यांचे पथक तयार करुन त्यांना पंच व योग्य साहीत्यासह सापळयाकामी रवाना केले असता,सुमारे १७.३० वा. दरम्यान एक संशयीत इसम त्या परिसरात आल्याने सापळा पथकाने त्यास ताब्यात घेवून त्यांचेकडे चौकशी करता त्याने त्याचे नाव **मुन्ना कार्तिक नाहक** रा. चाकण,मुळ राहणार ओडीसा असे सांगितले.त्यांचे जवळील बॅग व गोनीची झडती घेता त्यामध्ये एकुण १० बॉक्स त्यात प्रत्येकी २.५ किलो गांजा असा २५ किलो गांजा किंमत अंदाजे ५,००,०००/- रुपये मिळून आला असून त्याने विरुध्द एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क), २० (ब) (ii) (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक गायकवाड करीत आहे

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री विनयकुमार चौबे,** मा. सह पोलीस आयुक्त **श्री मनोजकुमार लोहीया,**मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे,** मा.पोलीस उप-आयुक्त **विवेक पाटील,** मा. सहाय्यक पोलीस आयुक्त **श्रीमती .प्रेरणा कट्टे**, वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री ज्ञानेश्वर साबळे,** पोलीस निरीक्षक (गुन्हे) **श्री किशोर पाटील,**पो.उप-निरीक्षक**प्रदिप गायकवाड** पोना/१६९१ चाफळे,पोहवा/४६७ नवले, पोना/१२७३ वाजे,पोना/पाटील,पोअं/२२७५ खैरे,पोअं/२८०० खेडकर,पोअं/२४३५ माटे,पोअं/२२९५ खराडे महाळुंगे पोलीस चौकी यांनी केली आहे.

( विवेक पाटील )
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड